Historicity Research Journal
Volume 2 | Issue 2 | Oct 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# मराठी बखर : एक ऐतिहासिक वाङ्मय प्रकार

**जनार्धन दामू परकाळे**

सहा. प्राध्यापक मराठी विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय , अकलूज ता. माळशिरस.

**प्रस्तावना :**

कोणताही वाङ्मय प्रवाह अचानक जन्मास येत नाही, तसा नाशही पावत नाही.मराठी वाङ्मया च्या गंध विभागात ‘बखर‘ वाङ्मय हा एक वैभवशाली गद्य वाङ्मय प्रकार मानला जातो. मराठी वाङ्मयात इतिहासातील गद्यं वाङ्मयास महत्वपूर्ण स्थान आहे.बखरीचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्याऐवजी मराठेशाहीतील गद्य वाङ्मयाचा एक नमुना म्हणून केला तर वाङ्मयीन सौंदर्याचे मोठे भांडार आपणासमोर खुले होते. तत्कालीन राजकारणातील व्यक्तीजीवनाचा वारसा जतन करण्याचे श्रेय बखरीचे आहे. प्रासंगी मराठी साहित्य पदयरुपानय अवतरले पाठांतराची सुलभता, रूढ मुखोदगत पद्धतीमुळे पदय माध्यमाचा स्वीकार मोठया प्रमाणमत झाला होता. पुढे मराठीमध्ये गदय वाङ्मयाची सुरूवात महानुभावी ग्रंथकाराच्या गद्य ग्रंथाच्या रुपाने झाली. लीनचरित्र, स्मृतीस्थळ, या ग्रंथापूर्वीही काही कथा मौखिक परंपरेने कथाकथन पद्धतीने चालत असे. लोकजीवनात अशा कथांना महत्व होते. महिकावतीची बखर हा बखर वाङ्मयाच्या विकासाचा पहिला टप्पा होय.

**बखर : शब्दाचा अर्थ आणि व्युत्पती,**

बखर शब्दाचा अर्थ आणि व्युत्पती यासंबंधी अनेक विदवानांनी आपआपली मते मांडलेली आहेत. ‘बखर’हा शब्द मराठी ‘खबर’ (वार्ता, समाचार, वृत्त) या मुळ अरबी शब्दाचा विपर्यास होऊन आला. असे वि.का. राजवाडे यांना वाटते ते बखर वाङ्मयाविषयी बखर शब्दाचा अर्थ व उगमाविषयी चर्चा करताना म्हणतात. बक = बकणे म्हणजे बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी. परंतु हा अट्टाहास राजवडे यांचा मान्य करण्यासारखा नाही. कारण ज्या फार्शी भाषेच्या संपर्काने ज्या मराठयांनी इतिहास लेखनाची पदधत स्वीकारली. त्या फार्शी भाषेत ‘बखर’ हा शब्द नाही आणि बखर हा शब्द वर्णविपर्यायाने मराठीत स्वीकारला हे पटण्यासारखे नाही. महीकावती ची बखर ते पेशव्यांची बखर या काळात खबर आणि बखर हे दोन्ही शब्द, स्वतंत्र्यपणे आलेले आहेत. वि. का. राजवाडे म्हणतात. ‘मुसलमानामध्ये तवारिखा लिहिण्याची पदधत होती.म्हणून मुसलमानाच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठयांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला."

मराठी भाषेचा कोश तयार करताना जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांनी ‘बखर’म्हणजे पाकृत भाषेत राजादिकांचे लिहलेले गद्यरुप अशी अर्थसंकल्पना वापरली आहे. डॉ. पटवर्धन ,य. रा. दाते. य. न. केळकर आदी शब्दकोश कारांनी ‘खबर’हा मूळ शब्द मानून ‘बखेर’ शब्दाचे बातमी, हकीकत, इतिहास अर्ज असे अर्थ दिले आहेत. कृ. पा. कुलकर्णी या भाषा शास्त्रज्ञाने ‘बखर’या शब्दाचा वर्णव्यत्यास होऊन ‘बखर’ हे रुप बनले असावे, असे सांगितले आहे. वि. ल. भावे यांनी बखर हा शब्द माहिती देणे या अर्थाने मराठेशाहीत रुढ झालेला होता, असे सांगितले आहे. श्री. श. बा. जोशी यांच्या मते एक पत्रप्रकार असून ‘बखेर’या नावाचा कचेरी पत्राचा प्रकार मराठीशाहीत होता. त्यासाठी व्यवहार विषयक कागदपत्राप्रमाणे माहिती पत्र म्हणून बखर पत्र ही तयार होई. ते अधिकृतपणे पत्र मानले जाई. डॉ. श्री. र. कुलकर्णी यांनी ‘वृत्तांत’ या अर्थाने ‘बखेर’हा शब्द प्रथम आला असून अधिकृतपत्र अशा आशयाचा दुसरा उल्लेख असल्याने म्हटले आहे.

असे असले तरी मराठी भाषेत व वाङ्ममाच्या इतिहासात ‘बखर’ हा शब्द रूढ झाला आहे. ‘बखर’या शब्दाची एक स्वतंत्र वाङ्मय परंपरा निर्माण झाली आहे.

**बखरीची निर्मिती प्रेरणा व प्रयोजन**

बखर हे तत्कालीन महत्वाच्या घटनाचे वृत्तांतकथन असते. त्यातील तपशील पुराव्याने सिदध होणारा असतो. बखरकार हे फडावर, दफ्तरात काम करणारी अशी सामान्य कारकुनी पेशातील माणसे, आपल्या आश्रयदात्याच्या स्वकीयांच्या पराक्रमाचा वृत्तांत लिहून ठेवणे हा त्यांच्या लेखनाचा प्रमुख हेतू असतो. पूर्वजांच्या कर्तृत्वाचे पुढिल पिढीस स्मरण व्हावे म्हणून राजाने किंवा आश्रयदात्याने पदरी असलेल्या आश्रित कारकुन यांना आज्ञा करून बखरी लिहून घेतल्याचे जाणवते. घडलेल्या घटनांचा इतिहास जाणून घेण्याची प्रेरणा ही या मागे असावी. कारण प्रत्येक गोष्टीत कुतुहल असते. त्यामुळे इतिहास जाणून घेण्यासाठी ‘बखरी’ लिहिल्या जातात. बखर लेखन स्वयंप्रेरित नसून ते परप्रेरीत असे आहे. मात्र या निर्मिती मागची बखरकाराची प्रेरणा उदात्म अशी होती. बखर हा स्वतंत्र्य गद्य सारस्वताचा प्रकार आहे. इतिहासा संबंधी ने घडते त्याच्याशी निगडीत बखर हा प्रकार लिहिला जातो. बखर हा वाङ्मय प्रकार साहित्यसृष्ठी आणि इतिहासाची सृष्ठी या दोहोंच्या सीमारेषेवर उभा आहे. या वाङ्मय प्रकाराने गद्य वाङ्मयान इतिहास व ललीत यांचा सुंदर समन्चय साधला आहे. त्या दृष्टिकोनातून भाषिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, वाङ्मयीन इत्यादी अंगाने अभ्यस करणे महत्वाचे आहे. बखरीचे लेखन कुणाच्या ना कुणाच्या तरी आज्ञेवरून झालेले आहे. असे दिसते म्हणजे हे लेखन परप्रेरीत असे आहे.

**बखर एक वाङ्मय प्रकार**

मराठी बखर वाङ्मयाचे महाराष्ट्राच्या इतिहासाशी आणि विशेषतः मराठयांच्या इतिहासाशी जवळचा ऋणानुबंध आहे. मराठयांच्या कर्तृत्वाचे, त्यांच्या पराक्रमाचे ऐतिहासिक संदर्भ बखर वाङ्मयात सापडतात. राजांच्या कर्तृत्वाचे पोवाडे, पराक्रमाच्या नोंदी असे ऐतिहासिक संदर्भ बखर वाङ्मयात सापडतात. वस्तूनिष्ठ सत्य रूपात राजकीय स्वरूपाच्या ऐतिहासिक लेखनाचा आढावा या बखरीतून प्रकट झाला आहे. राजकीय घडामोडींना त्या त्या राजवटीतील सुसंगत घटकांना जसे महत्त्व आहे तसे वाङ्मयदृष्टया इतिहास कथानिवेदनास महत्व आहे

बखर हा स्वतंत्र्य व संपन्न वाङ्मय प्रकार आहे. बखरकार भुतकाळातील व्यक्तींना, घटनांना शब्द सामर्थ्याव्दारे जीवंत करून विषयांशी एकरूप होवून सहजतेने पुनः प्रत्यय घडवितात. त्याच बरोबर बखरीत शैलीदार भाषा, दृष्ठांत, म्हणी, सुभाषिते, दोहे, वाक्यप्रचार यांचा सहज सुंदर वापर करतात. घडलेल्या घटनांची माहिती यात आहे. बखर वाङ्मय लिहित असताना लेखकासमोर पुराणाचा आदर्श असतो. पौराणिक, अद्भत कथेत अतिशयोव्यक्तीचा प्रभाव पडल्यामुळे बखरीची परंपरा पौराणिक आहे असे श्री. र. कुलकर्णी यांचे मत आहे.

बखर वाङ्मय ही केवळ कल्पानाविलासाची निर्मिती नसते. तिचा आधार राजकीय इतिहासात व लौकिक जीवनात आपले पाय घटट रोवून असतो. शकावली यादी सारख्या प्रमाणभूत इतिहासाच्या आधारावर कागदपत्रातील अधिकृत माहितीच्या मदतीने त्या आख्यायिका म्हणजे वास्तव इतिहास कथा आकाराला येते. ऐतिहासिक व्यक्ती व प्रसंग यांचे चित्रण करताना मानवी भावना, विचार, विकार याची सांधेजोड केली जाते. स्थल काल, व्यक्ती, प्रसंग यांनी बद्ध असलेल्या कालपटावर आपल्या प्रतिभेने बखरकार जीवंत चित्रण करीत असतो. भावनेचे जिव्हाळे ओततो. बखरीच्या अतंरंगात राजकीय इतिहासा बरोबर तत्कालीन समाज व संस्कृतीचे दर्शन घडते. किंबहुना राजकीय इतिहासाचे सुसंगत, कथात्मक निवेदन हेच बखरीचे व्यवच्छेदक लक्षण मानले जाते. म्हणूनच वाङ्मय व इतिहास या दोन्ही दृष्टिने आशय अतिव्यक्तीच्या बाबतीत बखरीचा विचार महत्वाचा ठरतो.

**बखरीचे वर्गीकरण**

बखरीचे वाङ्मयीन दृष्टिकोनातून पुढिल प्रमाणे वर्गीकरण केले आहे.

**अ) चरित्रात्मक बखर**

१) ९१ कलमी बखर - ही बखर दत्ताजी त्रिमल वाकेनवीरू यांनी शिवचरित्रावर १७६ - १७७० या काळात लिहिली आहे.
२) सभासदाची बखर ही बखर कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिवचरित्रावर १६९७ मध्ये लिहिली आहे.
३) श्री शिवदिग्विज या बखरीचे लेखन खंडोबल्लाळ चिटणीस यांनी शिवचरित्रावर १७७८ मध्ये लिहिली आहे.

**आ) युदधकथात्मक बखर**

**१) राक्षसतागडीची बखर**
या बखरीची निर्मिती विजयनगरचा विध्वंस या विषयावर १७६५ मध्ये लिहिले

**२) भाऊसाहेबाची बखर**
या बखरीचा बखरकार कृष्णाजी शामराव असून त्यांनी पानिपत युदध यावर १७९० मध्ये लिहिले.

**३) पानिपतची बखर**
या बखरीचा बखरभार रघुनाथ यादव असून त्यांनी चित्रगुप्त पानिपत युदध या विषयावर बखर लेखन केले आहे.

एकुण बखर वाङ्मयाचा विचार करता कालक्रमानुसार बखर वाङ्मयाचे शिवपूर्वकालिन बखर शिवकालिन बखर, आणि पेशवे कालिन बखर असे प्रकार पडतात.

**अ) शिवपूर्वकालिन बखरी**
शिवपूर्वकालिन काळात मराठे सरदार व सैनिक दुस-या ठिकाणी चाकरीस असल्यामुळे बखरीचा कर्ता एकच एक नसल्यामुळे बखरी कमी लिहिल्या आहेत. काही बखरी पुढील प्रमाणे.

१) महिकावतीची बखर २) राक्षेसतागाडीची बखर ३) शालिवाहनाची बखर. इत्यादी

**१) महिकावतीची बखर**

ही सर्वात जुनी बखर म्हणून ओळखली जाते. या बखरीचा कालखंड इ.स.११३८ असा मानला आहे. या बखरीचा लेखक केशवाचार्य असून त्यांनी मालाडच्या देसला नायकोराव यांच्या इच्छेनुसार या बखरीचे लेखन केले आहे. या बखरीमुळे कोकणचा अज्ञात इतिहास प्रथमच प्रकाशान आला. या बखरीतून तत्कालीन राज्यव्यवस्था, जमीन मोजण्याची पदधती, संरक्षणार्थ सैनिकच्या व सरदाराच्या यादया, नावे, गावे, किल्ले या गोष्टी महत्वपूर्ण आहेत. ही बखर एकुण सहा प्रकरणात विभागली आहे. या बखरीत वंशोत्पतीवर्णन कोकणातील सूर्यवंशीय, सोमवंशीय, कुळाच्या पूर्व पीठीका दिल्या आहेत. या संदर्भाने अनेक पौराणिक कथा सांगितल्या आहेत. उदा. सुलोचना विचित्रवीर्य कथा, पदमावती स्वयवर कथा इत्यादी. बखरीतील व्यक्तीदर्शन, युदध-प्रसंग, कथा प्रवाहाची मालिका, निवेदनशैली, सुत्रबदध तशीच प्रौढ भाषाशैली अशी बखर नटलेली आहे.

**२) राक्षेसतागडीची बखर**

या बखरीची निर्मिती इ. स. १५६५ ते ६६ मध्ये झाली आहे. या बखरीत विजयनगरच्या विध्वंशाची माहिती दिली आहे. यात राजभुवराचे वर्णन विस्तृत आले आहे. त्याचबरोबर पागा, पीलखाना,उस्तरखाना, इत्यादीचे वर्णन आले आहे. या बखरीची भाषा कानडी मिश्रीन वळणाची आहे. या बखरीला मूळ आधार कानडी बखरीचा आहे. ही बखर निरलंकृत भाषाशैली, व्यक्ती व घटनांचे वर्णन यामूळे तिचे स्थान उच्च पातळीवर जाते.

**३) शालिवाहनाची बखर**

शालिवाहनाचा काळ इ. स. पूर्व पहिल्या शतकापासून इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यतचा होता. या बखरीची स्वरूप अकरा बंद आणि मोडी लिपीक असे आहे. बखरीचे लेखन पौराणिक पदधतीने केले आहे. त्यामुळे अदभूतता अधिक आहे यातील भाषा अर्वाचीन असली तरी अशुदध अशी आहे यात कृतयुग, त्रेतायुग, व्दापारयुग, आणि कलियुग याची माहिती दिली आहे.

शिवपूर्वाकालिन बखरी थोडया असल्या तरी गुणांनी परिपूर्ण अशा आहेत. मराठी गदय ऐतिहासिक लेखनाचा प्रारंभ येथून झ ााला. महिकावतीची बखर या बखरीने मुहूर्तमेढ रोवली.

**ब) शिवकालिन बखर**

शिवपूर्वकालापेक्षा शिवकालातील बखरीची संस्था जास्त आहे. छ. शिवाजी महाराज हे या काळातील थोर विभूती असल्याने बखरकाराच्या लेखनाचा विषय छ. शिवाजी महाराज व त्यांचे सरदार हे आहेत. एकूण बखरीपैकी शिवकाळातील बखरी या निम्यापेक्षा जास्त आहेत. त्यातील महत्वाच्या बखरी पुढिल प्रमाणे.

**१) ९१ कलमी बखर**

या काळातील शिवचरित्रावरील पहिली बखर लिहिली आहे. दत्ताजी त्रिमल वाकेनवीस यांनी तत्कालीन काळातील राजदरबारातील प्राथमिक नोंदी, यादी, वंशावळी या बखरीत लिहिल्या आहेत. सहज भाषाशैली, अलंकार व कल्पनविलास यांच्या आहारी न जाता प्रसंगाची गुंफण केली आहे.

**२) सभासदाची बखर**

या बखरीची निर्मिती कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजारामाच्या आज्ञेने जिंजी येथे इ. स. १६९४ मध्ये लिहिली. छ. शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर केंद्रीत ही बखर आहे. छ. शिवाजी महाराजांचे त्रोटक पूर्वचरित्र, अफझलखाना चा वध, त्यांचे दिल्लीस प्रयान, शिवराज्याभिषेक, वेगवेगळया भागानगरास भेट इत्यादी प्रसंगाचे सविस्तर वर्णन आले आहे. या बखरीत कालनिर्देश, व्यक्तीनिर्देश, घटनांचे तपशीलवार वर्णन, अठरा कारखाने, खजिना, शिलेदार, सुभेदार, कारकून, हुजरे, गड, कोट इत्यादी. जमाखर्च तपशीलही आढळतो. बखरकाने या बखरीत घटनांचा क्रम कालक्रमानुसार मांडला आहे. या बखरीत नाटयपूर्व प्रसंगाचे चित्रमय वर्णन अफझलखान वध प्रसंगान पाहल्यासारखे आहे.

**३) चित्रगुप्ताची बखर**

रघुनाथ यादव चित्रगुप्त यांनी इ. स. १७६१ मध्ये चित्रगुप्तविरचित्रत शिवाजी महाराज बखर किंवा चित्रगुप्ताची बखर लिहिली आहे. यमाच्या दरबारी जसा साक्षात चित्रगुप्त चिटवीशी करी तसा रघुनाथ यादव राजारामपुत्र छ. शंभु यांच्या कोल्हापूर दरबारी चिटणीशी लेखनाची सेवा करी. म्हणून रघुनाथ यादवांनी आपले आडनाव चित्रे असे न लावता पौराणिक थाटात चित्रगुप्त असे लावले.( वि. का. राजवाडेः ऐतिहासिक प्रस्तावाना - १९२९ - पृ २१६ ) चित्रगुप्तचीयांनी ही बखर शंभूराजाच्या मृत्यूनंतर यशवंराव शिंदे यांचेकडे चिकोडीला आले नंतर लिहिली. या बखरीत पौराणिक दाखले. संस्कृत प्रचुर शब्द, फारशी, उर्द, मराठी, संस्कृत इ. भाषांचा वापर केला आहे.

**४) भोसले वंश चरित्र**

यात तंजावरच्या भोसले घराण्याचा इतिहास आहे. वृहदीश्वराच्या देवळाच्या शिलालेखावरून या बखरीचा वृत्तांत घेतला आहे. ही बखर शरफोजी राजांच्या आज्ञेवरून बाबूराव चिटणीस यांनी लिहिली आहे. यात छ. शिवाजी राजांच्या चौदा पिढयांचा नामोउल्केख आला आहे.

**५) शिवदिग्विजय**

खंडो बल्लाळ चिटणीयांनी विस्तृतपणे छ. शिवाजी महाराजांचे चरित्र इ. स. १७२८ मध्ये लिहिले आहे. या चरित्रासाठी विष्णूपुराण, रजपुताच्या राजावळी, यवनांच्या तवारीखा याचा आधार घेतला आहे.

**६) श्री शिवाजी प्रताप**

या बखरीचे लेखन सयाजीराव गायकवाड यांचे आज्ञेवरून ऐतिहासिक प्रमाणात नसलेली कल्पनाप्राचुर्याचा दिमाखा असलेली बखर होय.

**७) शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र**

मल्हार रामराव चिटणीस यांनी इ. स. १८१० मध्ये हे चरित्र लिहिले. छ. संभाजी महाराजांचे पूर्वजन्मवर्णन, जन्मकथा, राज्य-आक्रमण, अफझलखान वध राज्यमर्यादा स्थापना, दिल्लीपती पराभव, आणि राज्याभिषेक असे चरित्र चित्रण केले आहे.

याशिवाय, चिटणीयांनी संभाजी महाराज चरित्र, थोरले राजाराम चरित्र, श्रीमंत धाकटे रामराजे यांचे चरित्र, श्रीमंत धाकटे शाहू यांचे प्रकरण यासारख्या बखरीतून मराठयांचे चरित्र लिहिले आहे. बखरीतून वैयक्तिक भावजीवनांचा उलगड होताना दिसतो. अशा बखरींना अनन्यसाधारण महत्व आहे.

**क) पेशवे कालीन बखरी**

पेशवे कालीन बखरीचे स्वरूप विविधांनी स्वरूपाचे आढळते. प्रसंगात्मकथा, चरित्रात्मकता, आत्मचरित्रपर, घराण्यांच्या हकीकती, अशी विविधता आढळते. पेशवेकालीन बखरीमध्ये भाऊसाहेबांची बखर, पाणिपतची बखर, नाना फडणीसाचे आत्मचरित्र, गंगाधरशास्त्री यांचे आत्मचरित्र, यासारख्या बखरी लिहिल्या आहेत.

**‘पाणिपतची बखर’** ही रघुनाथ यादव उर्फ चित्रगुप्त यांनी श्रीमंत महाराज मातोश्री गोपिकाबाई यांच्या आज्ञेने पुणे येथे लिहिली. ‘पाणिपत’ या शब्दाला मराठीत एक वेगळाच अर्थ मिळाला आहे. दु:ख आणि अभिमान या दोहोंचे तो प्रतीक बनला आहे. पाणिपतच्या युध्दावर मराठीत मोजक्याच पण लक्षणीय बखरी लिहिच्या गेल्या. त्यातील रघुनाथ यादव यांची ‘पाणिपतची बखर’ ही महत्वाची बखर होय. युध्दप्रसंगाचे वर्णन हे प्रस्तुत बखरीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याशिवाय युध्दवर्णनातील बखरीमध्ये ‘भाऊसाहेबांची बखर’, ‘चेऊलची बखर’, ‘खडर्याच्या स्वारीची बखर’ या बखरींचा समावेश होतो. **‘पेशव्यांची बखर’** ही बखर नाना फडणीसांनी आठ वर्षे वयाच्या सवाई माधवरांवाकरिता चिटणीस बाळाजी गणेश या कारकूनाकडून इ. स. १७८२ मध्ये लिहून घेतली. या बखरीत छ. शिवाजी महाराजांनी ‘महाराष्ट्र राज्याच्या वृध्दीविषयी’ साहस करून राज्याभिवृध्दी कशी केली याचे निवेदन आहे. या बखरीची भाषा साधी, सरळ व प्रासादिक आहे. **‘भोसलेवंशचरित्र’** ही १८०३ मध्ये सरफोजीराजे यांचा मित्रसेवक बाबूराव चिटणीस यांनी लिहिली. महाराष्ट्राबरोबरच तंजावरच्या येथे असलेल्या भोसले घराण्याचा इतिहास या बखरीतून साकार झाला आहे. त्यामुळे अन्यत्र न आढळणारे व तंजावरच्या राजघराण्याशी संबंधीत असलेले अनेक तपशील सालक्रमानुसार या बखरीत आढळतात. गणपतराव गोविंद बर्वे यांनी इ. स. १८१७ मध्ये **‘मराठी साम्राज्याची छोटी बखर’** लिहिली यातून त्यांनी मालोजीपासून ते शेवटचा छत्रपती प्रतापसिंह यांच्यापर्यंतची हकीगत असल्याचे बखरीतील प्रकरणांवरून दिसते. या बखरीच्या अखेरीस वंशवर्णन व वंशावळी असे दोन परिशिष्टये दिली आहेत. याशिवाय ‘भट पेशवे घराण्याची हकीगत (१८१८)’, ‘नागपूरकर भोसल्यांची बखर (१८२२)’, ‘श्रीमंत महाराज भोसले यांची बखर’, ‘शेडगावकरांची बखर (१८५४)’, ‘पेशव्यांची बखर (१८५५)’ यासारख्या बखरी मराठी बखर वाङ्मयात लिहिल्या गेल्या.

बखर वाङ्मयाबरोबरच‘ कैफियात’ हा एक प्रकार या काळात अस्तित्वात आला होता. कैफियत म्हणजे यर्थाथ माहिती होय. पेशवेकाळात ‘श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत’, ‘सरदार गोखले यांची कैफियत’,‘ होळकरांची कैफियत ’अशा कैफियती लिहिल्या गेल्या. या काळात मोठया व्यक्तीने मोठया व्यक्तीला पाठवलेली पत्ररूप हकीगत म्हणजे थैली हा बखरीत सामावणाऱ्या लेखनाचाच एक प्रकार अस्तित्वात होता. उदा. होळकरांची थैली / मल्हार होळकर यांची थैली शिवाय बातमीपत्रवजा बखरीचा एक नमुना म्हणून ‘हकीगत’ ओळखली जाई.

आशयाच्या दृष्टीने इतिहासाशी समकक्ष निगडीत असलेली ही बखर वाङ्मयाची परंपरा अभिव्यक्तीच्या दृष्टिने मात्र विविध रूपे स्वीकारते. यादवकाळात ती आख्यायिकांच्या रूपाने जन्माला आली. शिवकाळात चरित्रकथेच्या रूपाने तर पेशवेकाळात अनेकविध रूपाने आविष्कृत झाली. मराठी बखरींचा या विकासक्रमाने अभ्यास केला असावा. यामध्ये निर्मितीकाव्याची एकसलग अशी संगती असल्याचे दिसते. बखरीच्या या विकासक्रमात तिच्या वाङ्मयीन रूपावर व परंपरेच्या विकासावर प्रकाश पडतो. त्यामुळे मराठी बखरींच्या वाङ्मयीन व आकृतिबंधाचा व गुणवैशिष्टयांचा शोध घेणे सुलभ होते.

बखर वाङ्मयातून अनेकविध व्यक्तीचित्रणे आकाराला आली आहेत. आज जो मराठयांचा इतिहास आपल्यासमोर उभा आहे तो बखर वाङ्मयाच्या आधारेच उभा आहे. या बखरीतून शिवाजी महाराजांनी घडविलेले परिवर्तन, त्यांचे व्यक्तीदर्शन, संभाजी महाराजांचे चित्रण, राजाराम महाराज, औरंगजेब बादशाह, शाहू महाराज, भाऊसाहेब, मल्हारराव होळकर, चिमाजी आप्पा, पहिले बाजीराव पेशवे, यशवंतराव होळकर, पुरूषोत्तम दाजी, छत्रपती प्रतापसिंह महाराज तसेच जिजाबाई, सईबाई, सोयराबाई, महाराणी येसूबाई, ताराबाई, सकवारबाई, गोपिकाबाई, पेशवे, कृती - प्रवृत्तींचे वेधक आणि भेदक, विराट आणि विशाल असे दर्शन या बखरीतून प्रकट होते.

मराठी बखर वाङ्मयाच्या भाषेचा विचार करता ती केवळ गद्यलेखनांची भाषा नाही तर ती गद्य - पद्य मिश्रित अशी आहे. ती केवळ तार्किक विचारांची भाषा नाही तर ती मानवी भावभावनांची, विकारांची भाषा आहे. इतिहासातील व्यक्तींच्या मानवी भावभावनांचे अनुभवविश्व कथन करणारी आहे. या भाषेचे स्वरूप हे जड भाषेचे नसून ते ललित वाङ्मयाच्या भाषेचे आहे. या भाषेत गद्यशैलीचा विकास झालेला आहे. लयबध्दता व नादमाधुर्य तीमधून कमी अधिक प्रमाणात आविष्कृत होताना दिसते. सुबोधता, काव्यात्मता, विचारसौंदर्य, अनुभवसंपन्नतेचे भावसौंदर्य, निवेदनाचा कलात्मक आविष्कार, अल्पाक्षर रमणीयता, साचेबंदपणाची मर्यादा, संस्कृतप्रचुर वस्तुनिष्ठ सांकेतिकता, बहुश्रुतता, आत्माविष्काराचा स्पर्श, समुदायवर्णन, रचनावैशिष्टय, प्रसंगवर्णन यासारख्या अनेकविध अभिव्यक्ती विशेषांनी बखर वाङ्मय महत्वाचे व वैशिष्टयपूर्ण ठरले आहे.

थोडक्यात महाकावतीच्या बखरीपासून पेशवेकाळात अनेक बखरी लिहिल्या गेल्या. यातून तत्कालीन मराठी सत्तेचे, मराठी साम्राज्याचे दर्शन घडत गेले.

**संदर्भ**

१) नसिराबादकर ल. रा. - प्राचीन मराठी वाङःमयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर - २००८.
२) कामतीकर कृष्णाजी शामराव - भाऊसाहेबांची बखर, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद - १९९५.
३) ह. श्री. शेणोलीकर - मराठी वाङःमयाचे स्वरुप.
४) जोशी पं. महादेवशास्त्री - भारतीय संस्कृती कोष खंड - सहावा.
५) राजवाडे वि. का. - मराठ्यांचा इतिहासाची साधने खंड - चार.
६) हेरवाडकर र. वि. - मराठी बखर, व्हिनस प्रकाशन, पुणे १९७५.